## राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

*(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल**
**क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र ५००/२०२०/नाशिक**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. उत्तम किसन पठारे, "विश्वासू" प्लॉट क्रमांक ३६, सर्वे क्र ३१/१/१/१, पेठ रोड, आर टी ओ ऑफिसजवळ, सप्तरंगी सोसायटीच्या मागे, पंचवटी, नाशिक, जि. नाशिक | जन माहिती अधिकारी, नगर पंचायत पेठ, ता. पेठ, जि. नाशिक | मुख्याधिकारी, नगर पंचायत पेठ, ता. पेठ, जि. नाशिक |

सुनावणी दिनांक — २७/१०/२०२३

**१) उपस्थिती —**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| उपस्थित | अनुपस्थित | उपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |

**२) द्वितीय अपील अर्ज —**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : २७/१/२०२०

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : संपूर्ण व सखोल माहिती चौकशी न करता दिली

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : कोणतीही विनंती केलेली नाही

**३) माहिती अर्ज —**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : ०४/१०/२०१९

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०४/१०/२०१९

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : सन २०१८-१९

**(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :** आपण शासनाच्या कोणत्या नियमाने घरपट्टी आकारली आहे तो शासनाचा आदेश नक्कल संहित व शासनाचे अधिकृत घरपट्टी आकारण्याचे गणिती सूत्र व प्रत्यक्ष घरपट्टी आकारली आहे त्याची आकडेमोड मिळणेबाबत..

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** दिनांक २३/१०/२०१९ च्या पत्रान्वये रुपये ६२/- माहिती शुल्क भरण्याबाबत कळविण्यात आले होते. तदनंतर दिनांक ४/११/२०१९ च्या पत्रान्वये एकूण ६ पृष्ठाची माहिती अपीलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी दिली असल्याचे दिसून येते.

४) प्रथम अपील -

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : २८/११/२०१९

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २८/११/२०१९

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : अर्जाचे उत्तर वेळेत दिलेले नाही, चुकीची व अपूर्ण माहिती दिली, अधिकच टपाल खर्च वसुल केला, अपील अधिकारी नमूद केलेले नाहीत..

(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, पेठ नगरपंचायत यांनी सुनावणी घेऊन दिनांक १०/१/२०२० रोजी अपीलार्थी यांच्या प्रथम अपीलावर निर्णय पारित केला असून त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी १० दिवसात उपलब्ध माहितीची प्रत देण्यात यावी असे आदेशीत करून प्रथम अपील निकाली काढण्यात आलेले आहे. तदनंतर दिनांक २०/१/२०२० रोजीच्या पत्रान्वये ७ पृष्ठाची माहिती अपीलार्थी यांना देण्यात आली असल्याचे दिसून येते.

५) युक्तिवाद/लेखी खुलासा —

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान असे स्पष्ट केले की कार्यालयात उपलब्ध माहिती अपीलार्थी यांना पुरविण्यात आलेली आहे. अपीलार्थी यांनी, त्यांना देण्यात आलेली माहिती अपूर्ण आणि चुकीची असल्याचे स्पष्ट केले. तसेच घरपट्टी आकारणी संदर्भात केरळ उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा हवाल देत नगर पंचयातीला शेतघरावर घरपट्टी आकरता येणार नाही असेही नमूद केले.

६) निष्कर्ष —

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध माहिती पुरविलेली आहे. तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलात सुनावणी घेऊन आदेश पारित केलेले आहेत. घरपट्टी आकारणी सदोष असल्यास योग्य प्राधिकारणाकडे दाद मागणे आवश्यक आहे.

सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

**आदेश**

प्रस्तुतचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

जावक क्र. आ-३२६३ 30 OCT 2024